**प्रेस नोट** दिनांक - २०/१०/२०२६

**मुंबई गुन्हे शाखेची अंमली पदार्थ तस्करांविरुध्द मोठी कारवाई, १० कोटी रूपये किंमतीचा २ किलो हेरॉईन जप्त करून तस्करी करणाऱ्या आरोपींना अटक...**

| | | |
|---|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | :- | गु.प्र.शा., गु.अ.वि., वि.स्था.गु.र.क्र. १३४/२०२६, कलम ८ (क) सह २१ (क), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ (बोरीवली पो.ठाणे, गु.र. क्र.१२८९/२६) |
| **दाखल दिनांक** | :- | दिनांक १४/१०/२०२६ रोजी ११.२२ वा. |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | बोरीवली (प) मुंबई. |
| **आरोपीची संख्या** | :- | ०३ |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | :- | **१) एकुण २०३२ ग्रॅम वजनाचा गर्दा (हेरॉईन), किं.रु. १०,१६,००,००० /- रू. किंमतीचे हेरॉईन जप्त**<br>**२) ३०,०००/- रूपये किंमतीचा तीन मोबाईल,जु.वा.** |

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई सो. यांचे आदेशान्वये मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थाची तस्करी तसेच खरेदी विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यासाठी पोलीस उप आयुक्त, प्रकटीकरण १, गुन्हे शाखा, मुंबई यांचेव्दारे विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.

सदर मोहीमेदम्यान दिनांक १४/१०/२०२६ रोजी कक्ष ११, गु.प्र.शा.गु.अ.वि., कांदिवली (प), मुंबई येथे प्राप्त झालेल्या गोपनीय बातमीव्दारे **पोलीस** पथकाने तात्काळ व प्रभावीपणे कारवाई करुन दोन इसमांच्या ताब्यातील **एकूण ७५८ ग्रॅम वजनाचे ''हेरॉईन'', अं.किं.रु. ३,७९,००,००० /- किंमतीचा** अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. त्यानंतर दि. १७/१०/२०२६ रोजी अटक आरोपीतांचे तपासादरम्यान प्राप्त माहितीच्या अनुषंगाने तात्काळ व प्रभावीपणे कारवाई करून तिसऱ्या आरोपीताच्या ताब्यातुन **एकुण १२७४ ग्रॅम वजनाचा गर्दा (हेरॉईन), अं.किं.रु. ६,३७,००,००० /- रू.** किंमतीचा अमंलीपदार्थ जप्त करण्यात आला. तिन्ही आरोपीतांकडुन **एकुण २०३२ ग्रॅम वजनाचे ''हेरॉईन'', अं.किं.रु. १०,१६,००,००० /- किंमतीचा** अंमलीपदार्थ जप्त करण्यात कक्ष-११ च्या पोलीस पथकाला यश आले आहे.

सदर प्रकरणामध्ये गु.प्र.शा., गु.अ.वि., वि.स्था.गु.र.क्र. १३४/२०२६, कलम ८ (क) सह २१ (क) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ (बोरीवली पो.ठाणे, गु.र.क्र.१२८९/२६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून नमूद आरोपीस हेरॉईन हा अंमली पदार्थाची तस्करी केली, जवळ बाळगला म्हणून सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात हेरॉईन तस्करी करणा-या परराज्यातील टोळीचा सहभाग दिसून येत असून अंमली पदार्थ पुरवठा करणारे तसेच त्यांची खरेदी विक्री करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही मा.श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री. कृष्णाकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा.श्री. नवनाथ ढवळे, पोलीस उप आयुक्त, प्रकटीकरण १, गुन्हे शाखा, मुंबई व सहाय्यक पोलीस आयुक्त, मुंबई श्री. सुरेश मदने यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ११ मुंबई अंतर्गत कांदिवली युनिट येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. शशिकांत जगदाळे, पोनि बाबासाहेब काकडे, पोनि विश्वास पाटील, सपोनि बनसोडे, मसपोनि सरला थोरात, पोउनि शिंदे, स.फौ.गायकवाड, पोह चोरमले, खांडेकर, खताते, गोवळकर, शिंदे, चव्हाण, जाधव, मपोह लाडे, पोहचा सानप, वारिक, पोशि वरठा, वळतकर, मपोशी गोसावी यांनी केली आहे.

----ooo----